तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय,
पत्ता :— जुना मुंबई पुणे रोड, लिंब फाटयाजवळ,
तळेगाव दाभाडे ता. मावळ ,जि.पुणे पिन नं. ४१०५०६
फोन नंबर — (०२११४) २२२४४४
ई मेल आय.डी.— *pstalegaond.pcpc-maha@gov.in*

# प्रेसनोट दिनांक ०७/११/२०२२

## तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. ४७९/२०२२ भा.दं.वि. कलम ३०२ इ. संबंधाने काल दिनांक ०६/११/२०२२ रोजी रात्रौ ०९.३० ते १०.३० वा. चे दरम्यान मयत नामे प्रणव उर्फ जय अनिल मांडेकर वय १९ वर्षे रा. इंदोरी, ता. मावळ, जि. पुणे हा त्याचे मित्रांसोबत इदगाह मैदान तळेगाव दाभाडे येथे गप्पा मारत बसलेला असतांना मयताचा मित्र नामे विशाल वर्मा व आरोपी मंगेश हिरे यांचेत फोनवर झालेल्या भांडण व बाचा—बाची वरून यातील आरोपी नामे १) कुणाल ठाकुर २) ढुंगन बाळया उर्फ रोहन सुरते ३) विकी पवार ४) मंगेश हिरे ५) निलेश घायके ६) सागर गाडे ७) रितेश शिंदे ८) चिक्या शिंदे ९) प्रथमेश पवार व इतर यांनी आपसात संगणमत करून मयत व त्याचे मित्र बसलेल्या ठिकाणी ६ ते ७ दुचाकींवरून येवुन मयत व त्याचे मित्रांवर दहशत निर्माण करून त्यांना मारण्यासाठी सोबत आणलेले कोयते, लोखंडी रॉड काढल्याने मयत व त्याचे मित्र जिव वाचविण्यासाठी तेथुन पळत असतांना आरोपीतांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. त्यावेळी मयत व त्याचा मित्र कौस्तुभ खाडे हे तुकाराम नगरकडे पळत असतांना मयत नामे प्रणव उर्फ जय अनिल मांडेकर यास रूग्वेद हॉस्पीटल, तुकाराम नगर येथे ठेच लागल्याने तो खाली पडला असता नमुद आरोपींतांनी सोबत असलेल्या कोयता, लोखंडी रॉड, पालघन यांसारख्या हत्यारांनी मयताचे डोक्यावर वार करून तसेच लाथा—बुक्क्यांनी मारहाण करून त्याचा खुन केल्याचे मयताचा मित्र कौस्तुभ खाडे याने पळतांना मागे वळुन पाहीले आहे. सदर संबंधाने फिर्यादी नामे अनिल ज्ञानेश्वर मांडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन सदर गुन्हयाचे अनुषंगाने आरोपी नामे १) सागर रमेश गाडे २) रोहन बापु सुरते ३) अमित श्रीकृष्ण टकले ४) मंगेश दशरथ हिरे ५) प्रथमेश गणेश बोरूडे यांना ताब्यात घेण्यात आले असुन विधीसंघर्षीत बालक नामे १) किरण काळुराम लोंढे २) चिक्या उर्फ रोहन उत्तम शिंदे ३) रितेश हिरामण शिंदे ४) प्रथमेश रविंद्र पवार यांना यांचेकडे चौकशी सुरू असुन उर्वरीत आरोपींचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.

तसेच वरील गुन्हयातील नमुद आरोपी सदर गुन्हा करून पळुन जात असतांना पोस्टे दाखल गुन्हा रजि. नं ४८०/२२ ३०७, १४३, १४४, १४७, १४८, १४९, ५०४, ३४ सह फौ. सु. अधि. क. ७ सह भा.ह.का. क ४(२५) सह म.पो.का. क. ३७ (१)(३), १३५ मधिल फिर्यादी नामे ध्रुव महेश खिल्लारे हा रात्रौ १०.३० ते ११.०० वा. चे सुमारास त्यांचे मित्रासोबत मोटार सायकल वरून रेल्वे स्टेशनमार्गे घरी जात असतांना आरोपी नामे चिक्या शिंदे याच्या मैत्रिणीला फिर्यादीचा मित्र मौसम शाहु हा बोलतो व मेसेज करतो व फिर्यादी हा त्याचे सोबत राहतो या करणावरून फिर्यादीस मारण्यासाठी कोयते, लोखंडी रॉड हातात घेवुन त्याचा पाठलाग करून आरोपी चिक्या शिंदे याने फिर्यादीचे मानेवर कोयत्याने वार केला पण फियादीने तो वार चुकवुन आपला जिव वाचवुन पळुन केला. त्यामुळे नमुद आरोपींचे विरोधात नमुद प्रमाणे गुन्हा दाखल असुन पुढील तपास सुरू आहे.

अशा प्रकारे नमुद आरोपीतांनी दिनांक ०६/११/२०२२ रोजी रात्रौ ०९.३० ते ११.०० वा. चे दरम्यान प्रणव उर्फ जय अनिल मांडेकर याचा मित्र नामे विशाल वर्मा व आरोपी मंगेश हिरे यांचेत फोनवर झालेल्या भांडण व बाचा—बाचीचे कारणावरून रूग्वेद हॉस्पीटल, तुकाराम नगर तळेगाव दाभाडे येथे कोयता, लोखंडी रॉड, पालघन यांसारख्या हत्यारांनी डोक्यात वार करून खुन केला असुन दुसरे

Scanned with CamScanner

गुन्हयातील फिर्यादी नामे ध्रुव महेश खिल्लारे याचा मित्र मौसम शाहु हा आरोपी नामे चिक्या शिंदे याच्या मैत्रिणीसोबत बोलतो व मेसेज करतो व फिर्यादी हा त्याचे सोबत राहतो या करणावरून नमुद फिर्यादीस जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याने वरील आरोपींविरोधात तळेगाव दाभाडे पोलीस ठाणेस नमुद प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सदर दोन्ही गुन्हयांचे अनुषंगाने आरोपी नामे १) सागर रमेश गाडे २) रोहन बापु सुरते ३) अमित श्रीकृष्ण टकले ४) मंगेश दशरथ हिरे ५) प्रथमेश गणेश बोरूडे यांना ताब्यात घेण्यात आले असुन विधीसंघर्षीत बालक नामे १) किरण काळुराम लोंढे २) चिक्या उर्फ रोहन उत्तम शिंदे ३) रितेश हिरामण शिंदे ४) प्रथमेश रविंद्र पवार यांना यांचेकडे चौकशी सुरू असुन उर्वरीत आरोपींचा शोध सुरू आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे सो., मा. अपर पोलीस आयुक्त श्री.संजय शिंदे सो., मा. पोलीस उपायुक्त परि.०२, श्री. आनंद भोईटे सो., मा. पोलीस उपायुक्त गुन्हे शाखा डॉ. श्री. काकासाहेब डोळे सो., मा. सहायक पोलीस आयुक्त देहुरोड विभाग/गुन्हे शाखा श्री. पद्माकर घनवट सो.यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि तळेगाव दाभाडे श्री. गणेश जवादवाड, वपोनि खंडणी विरोधी पथक श्री. अजय जोगदंड, पोनि गुन्हे श्री. नितिन लांडगे सपोनि अंबरीश देशमुख, सपोनि दुर्गानाथ साळी, पोउपनि संदेश इंगळे, शरद शिपने, मारोती मदेवाड, राहुल कोळी, मपोउपनि धापटे, स.फौ. पठाण, तापकीर, शिंदे, कदम, पोहवा जगदाळे, चव्हाण, गंभिरे,वाघ, गवारी, कानगुडे, पोना मगर, बाबळे, भालेराव, दळवी, चौधरी, पोशि डोळस, तारू, दरंदले, मिसाळ, मुंडे, मोरे, कदम, शेख यांनी विशेष कामगिरी करून आरोपींना ताब्यात घेतले असुन उर्वरीत आरोपींचा शोध सुरू असुन सदर दोन्ही गुन्हयांचा पुढील तपास चालू आहे.

( आनंद भोईटे )
पोलीस उपायुक्त, परि.०२
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

Scanned with CamScanner